# मुंबई विद्यापीठ

संचालक परीक्षा व मुल्यमापन
मंडळ यांचे कार्यालय, विद्यानगरी
परिसर मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई—४०००९८.

---

## परिपत्रक

DBoEE/ICC/2022-23/04

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२ मध्ये होणाऱ्या प्रथम सत्र उन्हाळी (मार्च/एप्रिल २०२२) परीक्षेबाबत.**

**संदर्भ : क्र. १) परिपत्रक** No.DBoEE/ICC/2021-22/23 **दि. २३/०२/२०२२**
**क्र. २) परिपत्रक** No.DBoEE/ICC/2021-22/24 **दि. ०४/०३/२०२२**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक /विभाग प्रमुख, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे, कल्याण व सिंधुदूर्ग उपपरिसरांचे समन्वयक /संचालक, महाविद्यालयांचे प्राचार्य यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या परीक्षा, यासाठीची कार्यपद्धती याबाबत मुंबई विद्यापीठामार्फत वरील संदर्भांकीत परिपत्रक / मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने परीक्षा आयोजित केल्या जाणार आहेत. तसेच परीक्षा सुरू होण्याच्या तारखांबाबत विद्यापीठाने वेळावेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकांनुसार परीक्षांचे आयोजन केले जाणार आहे. यानुसार विद्यापीठाच्या काही परीक्षा या २५ मार्च, २०२२ रोजी पासून सुरू करण्यात आलेल्या आहेत. यापुढील सुरू होणाऱ्या परीक्षा या जाहीर केलेल्या पॅटर्ननुसार व तारखांनुसार आयोजित केल्या जाणार आहेत, अशा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रतितास १५ मिनिटे अधिकचा वेळ देण्यात येईल व दोन पेपर्समध्ये दोन दिवसांचे अंतर (गॅप) ठेवण्यात येईल. तसेच विद्यार्थ्यांना प्रश्नसंच (क्वेश्चन बँक) उपलब्ध करून देण्यात येतील.

ठिकाण :— मुंबई — ४०००९८
दिनांक :— २९ एप्रिल, २०२२

( डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीसाठी योग्य त्या कार्यवाहीसाठी:—

१. विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित /संचलित महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपपरिसरांचे समन्वयक / संचालक,
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग, विद्यानगरी परिसर, मुंबई विद्यापीठ, मुंबई
३. स्वीय सहायक : १) कुलगुरू २) प्र—कुलगुरू ३) कुलसचिव
४. स्वीय सहायक अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, मुंबई विद्यापीठ, मुंबई
5- स्वीय सहायक अधिष्ठाता, मानव्य विज्ञान विद्याशाखा, मुंबई विद्यापीठ, मुंबई